**नियमित फौजदारी खटला क्र. १३४/२०२३** **निशाणी क्र. ३८**

सरकारपक्षातर्फे **साक्षीदार क्र. ५**

मी शपथेवर सत्य कथन करतो की,

**माझे नाव** – कांचन पांडुरंग भोजणे

**माझे वय** – २९ वर्षे, **व्यवसाय**– पी.एस.आय

**रा.** – इगतपुरी

**अभियोगपक्षातर्फे साक्षीदाराचा सरतपास श्री. ए.जी. मनियार यांच्यामार्फत**

दि. ०९.०५.२०२२ रोजी मी पोलीस स्टेशन वाडिव–हे येथे पी.एस.आय म्हणुन कार्यरत होतो. त्यादिवशी ठाणे अमंलदार खांदवे यांनी फिर्याद नोंदविल्यानंतर वरीष्ठांच्या लेखी आदेशान्वये सदर गुन्ह्याचे तपासकाम माझ्याकडे देण्यात आले. आता मला दि. ०९.०५.२०२२ रोजीची लेखी आदेश दाखविण्यात आला. त्यास **नि.३९** देण्यात येते. तपासकामी मी **नि.२१** वरील फिर्यादचे अवलोकन केले. त्यानंतर साक्षीदारांचे जबाब नोंदविले. तसेच फिर्यादीकडुन लग्नपत्रीका व लग्नामध्ये केलेल्या खर्चाच्या पावत्या हस्तगत केल्या. तपासादरम्यान माझी बदली झाल्याने पुढील तपास पोलीस हवालदार पी.के.कांबळे यांच्याकडे देण्यात आला. तपासादरम्यान आरोपींनी फिर्यादीला रु. ५लाखाची मागणी करुन शारीरीक व मानसिक त्रास दिल्याचे निष्पन्न झाले. आरोपींना पाहिल्यास मी ओळखु शकते. आरोपी आज न्यायालयात हजर आहेत.

**उलटतपास आरोपीतर्फे श्री. देवरे वकील यांच्यामार्फत**

२. एप्रिल २०२१ ते ऑक्टोबर २०२२ पर्यंत मी वाडिव–हे पोलीस स्टेशन येथे कार्यरत होते. हे म्हणणे खरे आहे की, पोलीस स्टेशन मध्ये आवक जावक रजिस्टर असते. हे म्हणणे खरे आहे की, फिर्याद दाखल झाल्यानंतर त्याबाबतची नोंद आवक जावक रजिस्टर मध्ये घेतली जाते. हे म्हणणे खरे आहे की, पोलीस स्टेशनमध्ये कोणताही अर्ज दाखल झाल्यास त्यावर निर्गती करुन तसा शेरा रजिस्टरमध्ये घ्यावा लागतो व तशी नोंद अर्जावर केली जाते. हे म्हणणे खरे आहे की, सदरची कार्यप्रणाली ही आवक रजिस्टर सोबत जावक रजिस्टर बाबत देखील केली जाते. हे म्हणणे खरे नाही की, पोलीस स्टेशनमध्ये अर्ज दाखल झाल्यास त्याची नोंद अर्ज डायरी मध्ये घेतली जाते. तपास करतेवेळी नि.२१ वरील अर्ज माझ्याकडे देण्यात आला नव्हता. हे म्हणणे खरे आहे की, आवक जावक रजिस्टर व स्टेशन डायरी याची प्रत दाखल केलेली नाही. हे म्हणणे खरे आहे की, केस डायरीचे उतारे

दाखल केलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, कोणतेही तपासकाम न केल्यामुळे त्याची प्रत दाखल केलेली नाही. हे म्हणणे खरे आहे की, आरोपींच्या घराच्या आसपास इतर घरे आहेत. हे म्हणणे खरे आहे की, तपासकामी आजुबाजुला राहणा–या लोकांचे जबाब नोंदविले नाही. तसेच त्यांच्याकडे सदर केस बाबत चौकशी केलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, पोलीस स्टेशन ते आरोपीचे घर यांच्यामध्ये अंदाजे ४ ते ५ कि. मी अंतर आहे. हे म्हणणे खरे आहे की, फिर्याद मध्ये आरोपींचे घर व पोलीस स्टेशनचे अंतर नमुद नाही. हे म्हणणे खरे नाही की, तपासादरम्यान फिर्यादी ही आरोपीकडे शहरात राहण्यासाठी हट्ट करत असल्याचे आढळुन आले होते. फिर्यादीने फिर्याद देतेवेळी आरोपींच्या आर्थिक परिस्थितीबाबत सांगितले नव्हते. आरोपी व फिर्यादी सन २०१९ पासुन विभक्त राहत असल्याचे माझ्या तपासात निष्पन्न झाले नाही. फिर्यादमध्ये आरोपीने फिर्यादीकडे पैशांची मागणी कधी केली याची तारिख, वेळ व वार नमुद नाही. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादी व साक्षीदार यांचे जबाब मोघम स्वरुपाचे आहे. हे म्हणणे खरे आहे की, फिर्यादीचे कोणतेही वैद्यकिय प्रमाणपत्र दाखल केलेले नाही. तसेच फिर्यादीने देखील मला वैद्यकिय प्रमाणपत्र दिलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, कोणतीही घटना घडलेली नसल्यामुळे वैद्यकिय प्रमाणपत्र दाखल नाही. हे म्हणणे खरे आहे की, फिर्यादी व आरोपी यांचे सी.डी.आर. हस्तगत केलेले नाही.

३. सा. क्र. ३ याने जबाब देतेवेळी 'फिर्यादीने त्यांना फोन करुन घटनेबाबत सांगितल्याचे' नमुद केले नव्हते. सा. क्र. ४ याने जबाब देतेवेळी 'आरोपींनी ट्रक्टर घेण्यासाठी रु. ५ लाख घेवुन ये' अशी मागणी केल्याचे सांगितले होते. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींनी ट्रक्टर घेण्यासाठी रु. पाच लाख मागितल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे आहे की, सा. क्र. ४ याने 'हुंडा घेण्यासाठी पाच लाख रु मागितल्याचे' सांगितले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, **नि.३९** वरील आदेशावर माझी सही नाही. तसेच त्या आदेशावर आवक जावक क्र. नमुद नाही. हे म्हणणे खरे आहे की, साक्षीदारांच्या टाइप केलेल्या जबाबांवर मी सह्या केलेल्या आहेत. हे म्हणणे खरे नाही की, सर्व साक्षीदारांचे जबाब एकसारखे आहेत. हे म्हणणे खरे नाही की, साक्षीदारांकडे कोणतेही विचारपुस न करता त्यांचे जबाब केवळ संगणकावर तयार केलेले आहेत. हे म्हणणे खरे नाही की, कोणतीही कायदेशीर फिर्याद नसतांना मी तपास केलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी कोणतेही कागदपत्रांची पडताळणी केलेली नाही. हे म्हणणे खरे आहे की, तपासकामी गावातील पोलीस पाटील, सरपंच व गाव तंटा मुक्ती कमिटी यांच्याकडे चौकशी केलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, सरतपासातील सांगितलेला मजकुर खोटा

नमुद केला आहे. हे म्हणणे खरे आहे की, आरोपींना दिलेल्या समजपत्रामध्ये न्यायालयात कोणत्या दिवशी हजर राहायचे याची तारीख नमुद नाही. हे म्हणणे खरे नाही की, सदर केसमधील पुर्ण तपास एकाच दिवशी संपवलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, दि. १०.०५.२०२२ नंतर मी कोणताही तपास केलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी क्र. ५,६ व ७ त्यांचा विवाह झाल्यानंतर त्यांच्या सासरी राहत होते. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादीने फारकतीसाठी रु ५० लाखाची मागणी केल्याचे माझ्या तपासात निषपन्न झाले आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी चुकीचा तपास करुन चुकीचे दोषारोप पत्र दाखल केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण.**

**फेरतपास नाही.**

**श्रवणोत्तर स्वीकृती,**

sd/-

**दिनांक** – २१.०२.२०२६ ( श्रीमती. ए. सी. रोकडे )

**ठिकाण** – इगतपुरी **प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, इगतपुरी, जि. नाशिक.**